- प्रकरण दुसरे -

# आनंद यादवांची थोडक्यांत माहिती व त्यांच्या वाङमयांचा थोडक्यांत परिचय

# प्रकरण दुसरे

## "आनंद यादवांची थोडक्यात माहिती व त्यांच्या वाङ्‍मयाचा थोडक्यात परिचय "

---

कथा, कविता, कादंबरी, समिक्षा इत्यादी साहित्य प्रकारात लक्षणीय स्वरूपाचे लेखन करणारे, सर्वसामान्यांचे आवडते व सर्वसामान्य समाजात जन्माला आलेले एक ग्रामीण लेखक म्हणून यादवांचे नाव मराठी वाचक मोठया आदराने घेतात.

आनंद यादवांचा जन्म कोल्हापूर जिल्ह्यातील कागल येथे एका शेतकरी कुटुंबात झाला. यादवांचे मुळचे आडनाव जकाते. अर्थातच् जकात गोळा करणे हा पूर्वजांचा व्यवसाय होय. मात्र पुर्वजांची सुदृढ स्थिती रतनू यादवांची म्हणजेच आनंद यादवांच्या वडिलांची नव्हती. एका जमीन मालकाच्या शेतावर एक कुळ म्हणून सर्व कुटुंब राबत होते. अज्ञान व दारिद्र्य यांचा परंपरागत वारसा घेऊन जगणा-या या कुटुंबात आनंद यादवांचा जन्म झाला . त्याकाळात कुटुंब कल्याणाचा काही प्रचार नव्हता व 'अष्टपुत्री सौभाग्यवती भव' या आशीर्वादाला अत्यंत महत्व असल्यामुळे व भरपूर मुले असणा-या स्त्रीला अत्यंत भाग्यवान समजले जात असल्याने आनंद यादवांची आई ताराबाई तशी भाग्यवानच होती. कारण आनंद यादवांना एकूण बारा भावंडे होती त्यात सर्वात जेष्ठ. म्हणजे आनंद यादवच होते. त्यामुळे आनंद यादवांनी परंपरागत शेतीच्या व्यवसायात मदत करावी अशी त्यांच्या वडिलांची अपेक्षा चुकीची होती असे म्हणता येणार नाही. घरचे आणि आजूबाजुचे वातावरण पूर्णपणे अडाणीपणाचेच होते. शेती, शेतमजुरी व गुरेढोरे सांभाळणे यापलिकडचे दुसरे वातावरण आनंद यादवांच्या बाबतीत

नव्हते. पण "झोंबी" या त्यांच्या आत्मचरित्रात्मक कादंबरीत शिक्षणासाठी यादवांनी जी अकल्पनीय धडपड केली व असीम हालआपेष्टा सोसल्या त्याचे विस्तृत वर्णन आपल्याला वाचायला मिळते.

आपल्या मुलांना शिकवलं पाहिजे हा विचार रतनूच्या मनात कधीच आला नाही. इतकेच नव्हे तर आपल्यासारख्या कुणब्याने शेती व शेतमजुरी तसेच गुरेढोरे याच्यापलिकडे जाणे किंवा पाटी, पेन्सिल, पुस्तक घेऊन शिकणे हे चुकीचे आहे. अशी आनंद यादवांच्या वडिलांची धारणा होती. आपणच नव्हे तर आपल्या मुलांनीही शिक्षण घेणे त्यांना मान्य नव्हते. शाळेपासून परावृत्त न होणा-या आनंदाला पाहून पोरगं बिघडलं अशी मनोमन खात्री रतनूची झाली. म्हणून बिघडलेल्या आंदाला वठणीवर आणण्यासाठी भरपूर प्रयत्न केला पण गुडीपाडव्याच्या शुभमुहूर्तावर नवीन कुडतं - चड्डी घालून , भेंड बत्तासू वाटून सुरू केलेलं आंदाचं शिक्षण , आंदाच्या दृष्टीकोनातून शुभ ठरलं. मात्र त्याच्या बापाच्या - रतनूच्या विचाराने ते अशुभच ठरलं. शिक्षणासाठी धडपडणा-या आनंदाला वठणीवर आणण्यासाठी सर्व प्रकारचे प्रयत्न वाढत गेले तेवढी आंदाची शिक्षणाची ओढ वाढत गेली. इतकेच नव्हे तर ते शिक्षण त्यांच्या मानगुटीवर बसले ते आजपर्यंत कधीच उतरलं नाही. आनंदाची आई त्यालाच मदत करते हे पाहून रतनूनं आपल्या पत्नीलाही बदडून काढलं. तरीही त्याचा काहीही उपयोग न झाल्याने हातच्या गेलेल्या पोराचा त्यांनी नादच सोडला.

रतनु वाया गेलेल्या पोराकडे पूर्ण दुर्लक्ष करू लागला खरा पण आंदयाला जास्तीत जास्त शेतीकामात कसे अडकवून ठेवता येईल याकडे लक्ष देऊ लागला. आनंदानं यावरही मात केली, शेती कामं सांभाळून तसेच आपल्या बापाची लहर सांभाळून आपला अभ्यास त्याने चालूच ठेवला. स्वतः अभ्यास करण्याच्या सवयीने त्यांनी अनेक पुस्तके वाचली. गोठयातील शेण काढता काढता त्या बालवयातही पुस्तकातले ज्ञान ते फस्त करू लागले होते. पुस्तकी ज्ञानाबरोबरच त्यांच्यातला कलावंत जागा होत होता. तमाशे, सिनेमे पहाणे, त्यातली गाणी, संवाद पाठ करणे व ती म्हणून दाखवून, कविता करून त्या गाऊन दाखविणे, नकला, नाटयछटा करणे या सर्वातून त्यांचे कलावंत मन प्रकट होत

होते आणि कळत-नकळत साहित्यिक आनंद यादव तयार होत होते. हे सर्व लक्षात घेता प्रश्न असा निर्माण होतो की, आनंद यादवांच्या वडिलांनी आनंदाला शिक्षणापासून दूर ठेवण्यासाठी शेतात राबायला ठेवले. गुरेढोरे सांभाळण्याची , शेण काढून गोठा साफ करण्याची, मोट धरण्याची, भांगलण, नांगरण करण्यासाठी कष्टाची कामे त्यांच्यावर लादलीच नव्हे तर आनंदाला त्यात जखडून ठेवले. त्यामुळे आनंदाला खरा साहित्यिक बनवण्याचं श्रेय रतनुला द्यायला नको का? कारण त्यामुळेच आनंद यादवांना चोरून का असेना सिनेमे, तमाशे पहाण्याची संधी मिळाली व त्यांच्यातील कलावंत जागा झाला. मळयात राहताना आजुबाजूच्या सौंदर्याने भारावून जाऊन त्यांच्यात निसर्गप्रेम निर्माण झाले. बालकवींच्या कविता अभ्यासताना त्यांच्याकडून 'हिरवे जग' लिहवून घेण्याची उर्मी निर्माण झाली. मळयात मुक्कामाला असताना येणा-या अनेक व्यक्तींचे दर्शन घेता घेता अनेक व्यक्तीचित्रणं त्यांच्या मनात निर्माण होऊ लागली. मळयांत सोबत करणारा गणपा आपल्या बोलण्यावागण्यातून, त्यानं सांगितलेल्या गावठी विनोदातून आनंद यादवांमध्ये हळूहळू कथाकार निर्माण होऊ लागला होता. आनंद यादव आपल्या झोंबी या आत्मकथेत म्हणतात -

> 'मळयाकडनं घराकडं जाताना आणि घराकडनं मळयाकडं येताना अर्धी राहिलेली कथा गणपा अंथरूणावर पडल्या-पडल्या पुरी करायचा, कधी गावठी विनोद सांगायचा बादली हातात घेऊन तो ती डफलीसारखी वाजवी कुठलीतरी लोकगीतं म्हणे. मी पण त्याच्यासारखी बादली घेऊन ती वाजवण्याचा प्रयत्न करी, सिनेमातलं गाणं म्हणे, मी दिवसभर त्याच्या जोडीला असे. त्याच्या हातबुडीच माझी नेमणूक झाल्याने मळयातली सगळी कामं मला त्यानं शिकवली. कामाविषयी प्रेम निर्माण केलं. कामाधामावर, गायी म्हसरावर , पिकापाण्यावर जीव जडू लागला. मळयाचा हिरवागार जीव वाटणारं उंबराचं जुनं-जुनं झाड आज्या पंज्यासारख वाटायचं. कधी कधी ते नातवाकडं ज्या नात्याच्या नजरेनं बघावं तसं माझ्याकडं बघतय असं वाटू लागायचं"[1] (पृष्ठ 116).

मराठी चौथीत असतानाच कविता लिहीण्याची उर्मी त्यांच्यात रतनूने त्यांना शेतात जखडून ठेवून निर्माण केली असे म्हटले तर वावगे ठरू नये. आनंद यादवांच्या भोवतालचे सामाजिक व कौटुंबिक वातावरण यांच्यामुळेच त्यांच्यातला साहित्यिक जन्म घेत होता. त्या काळातल्या त्यांच्या साहित्य निर्मितीबद्दल मळयाच्या मातीच्या प्रस्तावनेत अनुराधा पोतदार म्हणतात -

' या व्यथित एकाकी मनःस्थितीत यादवांचे बाल्य, त्यांचे नवतारूण्य जणू एकाएकी संपुष्टात आले. फार लवकर ते मोठे झाले, प्रौढ झाले, नव्हे तसे व्हावे लागले. वय वाढत होते तसतशी शेतातील अधिकाधिक कष्टाची कामं अंगावर पडत होती . मन कोळपून जात होतं, एकटे अंतर्मुख होत होते. शेतात, मळयात राबत असताना, घरात वावरत असताना, भावनाप्रधान मनाला भिडणारे, सलणारे सारे भलेबुरे अनुभव, स्वतःशी बोलावे तसे कवितेत व्यक्त होत होते. स्वानुभवाबरोबर सभोवती दिसणारे शेजा-यापाजा-यांचे जग, त्यातले अनुभव मन अलगद टिपत होते. कवितेत साकार होत होते. अशी पहिली कविता शाळेत 10वी - 11वीत असताना 1954-55 साली लिहली गेली'$_2$ (पृष्ठ 14)

अनेक आपत्तींना तोंड देत आनंद यादवांनी आपले शिक्षण कागलमध्ये आपल्या गावात पूर्ण केले. आपल्या मुलाने आता कुठलीतरी नोकरी करून संसाराला हातभार लावावा अशी अपेक्षा साहजिकच आई-वडिलांची होती. प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे आनंद यादवांच्या शिक्षणाला कारणीभूत झालेली आईसुध्दा पोराने एखादी नोकरी करून आपल्या सगळया भावंडाची होणारी उपासमार आनंदाने टाळावी, ही तिची अपेक्षा अयोग्य म्हणता येणार नाही. पण आनंद यादवांच्या समोर पुढील शिक्षणासाठी तळमळ लागून राहिली. आईवडिलांची अपेक्षा व त्यांच्यासमोरील ध्येय या संघर्षातूनच "मायलेकरं" हे दीर्घ काव्य त्यांची मनोभूमिका व्यक्त करताना दिसतो. घराकडून मदत तर मिळणार नाहीच उलट आपल्या शिक्षणाला आडकाठीच निर्माण होईल याची खात्री वाटल्याने व पुढील शिक्षणासाठी असणारी भूक बळावल्याने पळून जाऊन कोल्हापूर गाठले. प्रसंगी उपास सोसून त्यांनी आपले शिक्षण चालू ठेवले.

गावातील विष्णोबा सनगर या स्वातंत्र्य सैनिकाची मदत आनंद यादवांना झाली व त्यांच्या मार्गदर्शनाने रत्नागिरीला जाऊन तेथील सर्वोदय छात्रालयात राहून आपले महाविद्यालयीन शिक्षण सुरू केले. रत्नागिरीत कवि, य.द.भावे, प्रा. रा.वा.चिटणीस , त्याचप्रमाणे पु.ल.देशपांडे यांच्या सहवासात ते आले. त्यामुळे त्यांच्या शिक्षणाची उर्मी व साहित्यिकांची प्रतिमा प्रभावित झाली व 'हिरवे जग' मधल्या संकलित असलेल्या कविता त्यांच्याकडून लिहल्या गेल्या आणि या कविता संग्रहाला महाराष्ट्र राज्य साहित्य पुरस्कार मिळाला. आनंद यादवांच्या साहित्याच्या गौरवाला सुरूवात झाली त्यांना सरकार दरबारी मानसन्मान मिळाला.

आपल्या कोल्हापूरातील शिक्षण काळात ग्रामीण कथाकार शंकर पाटील, व्यंकटेश माडगुळकर इत्यादींचे कथा साहित्य यांचा त्यांना अभ्यास करता आला. त्यांच्यापासून प्रेरणा घेऊन त्यांनी त्याकाळात 'एकलकोंडा' ही कादंबरी लिहली. कोल्हापूरात बी. ए. पास झाल्यानंतर त्यांनी पुढील शिक्षणासाठी पुण्याला जायचे ठरविले. सुदैवाने आकाशवाणी केंद्रावर नोकरी मिळाली आणि घरापासून, आपल्या मातीपासून दूर जाणे त्यांना सहन होत नसले तरी उच्चशिक्षणासाठी आणि आपल्या साहित्यविषयक प्रतिभेला उजाळा देण्यासाठी मनाचा हिय्या करून अखेर पुणे गाठलेच. पुणे आकाशवाणी केंद्रावर ते शंकर पाटील, व्यंकटेश माडगुळकर व बा.भ. बोरकर यांचे सहकारी म्हणून काम करू लागले. अर्थातच् या लोकांच्या सहवासामुळेच त्यांच्या साहित्यिक कलागुणांना विशालता मिळत गेली.

आनंद यादव एम्. ए. झाले आणि मनापासून त्यांनी प्राध्यापकीचा व्यवसाय पत्करला. कारण या पेशाच्या सहाय्याने आपल्या वाचनाला व लिखाणाला भरपूर वाव मिळेल याची त्यांना खात्री होती. प्राध्यापकी पेशा पत्करल्यानंतरच त्यांच्या विविध वाड्.मय प्रकारांना सुरूवात झाली. आनंद यादव कालानुरूप साहित्य क्षेत्रामध्ये चमकू लागले . समाजामध्ये त्यांना मानमान्यता मिळत गेली. पण आपल्या मातीशी, मातीखालच्या मातीतील उबेशी असलेले आपले नाते तुटू न देण्याचा त्यांचा

प्रयत्न सातत्याने राहतो. 'पानभोवरे' हा त्यांचा ललित लेख संग्रहात त्यांच्या जीवनातील व्यक्तिगत अनुभव शब्दांकित झाले आहेत. पुण्यात शहरी वातावरणात राहूनही खेडयाकडे असलेला त्यांचा ओढा कमी झालेला नाही. 'उखडलेली झाडे' हा त्यांचा कथासंग्रह आपल्याला याची जाणीव करून देतो. ग्रामीण भागातील उपेक्षित शेतकरी, कामकरी याची जाणीव त्यांना आहे. कारण ते स्वतः व त्यांचे कुटुंब या अनुभवातून गेले आहेत. शिक्षणाशिवाय या समाजात स्वतःच्या विकासाला वाव मिळणार नाही. पाटीशिवाय पोळी साध्य करता येणार नाही. याची त्यांना जाणीव असल्याने त्यांचे साहित्य त्यादृष्टीने पुढे सरसावते. आनंद यादवांची लेखणी वाचकांच्या मनात आपुलकी निर्माण करणारी, त्यातील भाषाशैली मनाला भावणारी असते. म्हणूनच सर्वसामान्यांना आनंद यादव व त्यांचे साहित्य आपलेच वाटते.

आनंद यादवांनी साहित्यातील अनेक दालने समर्थपणे पार पाडली आहेत. सर्वप्रथम साहित्यक्षेत्रात ते कवि म्हणून आले. आनंद यादव सुरूवातीच्या काळात , अनेक नवकवी आपले कवित्व साहित्य क्षेत्राच्या पटलावर समर्थपणे मांडत असताना ग्रामीण अनुभूती आपल्या कवितांद्वारे जनसामान्यांच्यासमोर ठेवू लागले होते. 1960 मध्ये त्यांनी 'हिरवे जग' हा पहिला कवितासंग्रह प्रसिध्द केला. त्याला महाराष्ट्र शासनाचे पारितोषिक प्राप्त झाले. तद्नंतर त्यांची 'मळयाची माती' हा कवितासंग्रह जनसामान्यासमोर आला. "मायलेकरं" हे काव्य मुलाने आईशी साधलेला सुसंवादच होय. या कवितेतील आईचे भावविश्व अगदी अस्सल ग्रामीण-रूपात सादर केले आहे. 1965 मधील 'मातीखालची माती' ही व्यक्तीचित्रे त्यांच्या जीवनात येऊन गेलेली व त्यांच्या अंतःकरणात ठसलेलीच आहेत. 'मातीखालची माती' ऊब देणारी असते. तद्तवच या संग्रहातील व्यक्ती त्यांच्या अंतःकरणाला ऊब देणारी आहे.

त्यांनी अनेक ललित लेखही लिहले. 'स्पर्शकमळे' हे 1978 साली लिहलेले, तर 1982 मधील 'पानभवरे' होय. 1970सालची त्यांची लेखणी वगनाटयाकडे वळलेली दिसते. त्यांचे

समिक्षा लेखनही तितकेच विद्वत्तापूर्ण आहे. 1979 ते 1989 या दहा वर्षाच्या कालावधीत त्यांनी बरेचसे समिक्षा लेखनही केलेले दिसते. त्यांच्या ग्रामीण साहित्याच्या अवती-भवती घुमताना स्पष्टपणे जाणवते. मात्र ही सर्व वाङ्.मयप्रकारे हाताळताना सर्वसामान्यांना आनंद यादव भावले ते एक कथाकार व कादंबरीकार म्हणूनच.

यादवांचे कादंबरीलेखन ज्या काळात झाले ते कादंबरी लेखनसुध्दा तोडीस तोड होते. कथा लेखनाचे बोट धरूनच आनंद यादवही व्यंकटेश माडगुळकर, शंकर पाटील यांच्याप्रमाणे कथेकडून, कादंबरीकडे वळलेले दिसतात. स्वतः आनंद यादव म्हणतात -

> "आपल्या जीवनानुभवासाठी कथा किंवा कविता हे माध्यम पुरेसे नाही हे लक्षात आल्यावर आपण अनुभव द्रव्याची मागणी लक्षात घेऊन कादंबरी लेखनाकडे वळलो".

त्यांनी लिहलेली "एकलकोंडा" ही कादंबरी शिक्षणासाठी तळमळणा-या , धडपडणा-या एका ग्रामीण तरूणावर लिहिलेली आहे. त्यांची दुसरी कादंबरी "गोतावळा" 1971 मध्ये प्रसिध्द झाली. कोल्हापूर, कागल परिसरात सालगडी म्हणून शेतकाम करणा-या नारबाची ही आत्मकथा आहे.

तमाशाच्या नादी लागून उध्वस्त जीवन जगणा-या गुणा या तमाशा कलावंताच्या जीवनाची दु:खांतिका 'नटरंग' या कादंबरीत आनंद यादवांनी रेखांकित केले आहे. 'नटरंग' प्रमाणेच यादवांची 'माऊली' ही कादंबरी स्त्रीत्वाचा शोध घेण्याच्या प्रयत्नातून निर्माण झाली आहे. 'माऊली' विषयी अ.वा. कुलकर्णी लिहितात -

> "दार्शनिक तत्वज्ञान, लोकसाहित्य परंपरा, सनातन भारतीय समाजमन यांना हळुवार आणि तलम स्पर्श झालेली मराठी भाषेतील ही पहिलीच साहित्यकृती असावी इतकी ती वेगळी आहे". (पृष्ठ 14).

1987 मध्ये लिहिलेली "झोंबी" व 1990 मध्ये लिहिलेली "नांगरणी" या त्यांच्या आत्मचरित्रात्मक कादंब-या होत. 'झोंबी' या आत्मचरित्राला पूर्वार्ध व 'नांगरणी' उत्तरार्ध म्हणावा

लागेल. स्वत: लेखकाने या दोन्ही आत्मचरित्रांना, आत्मचरित्रात्मक कादंबरी असे म्हटले आहे. या कादंबरीतून लेखकाला स्वत:च्या माध्यमातून शिक्षणाची तळमळ बाळगणा-या ग्रामीण तरूणाचे मनोगत व्यक्त केले आहे. 'घरभिंती' ही कादंबरी त्यांच्या म्हणण्याप्रमाणे आत्मचरित्रात्मकच कादंबरी आहे. 'नांगरणी' नंतरचा पुढील जीवनप्रवास त्यात आलेला आहे. आनंद यादवांचे अशाप्रकारचे कादंबरी लेखन पाहिले. तरीही एक कुशल कथाकार म्हणूनच ओळखावे लागते. त्यांनी लिहिलेल्या कथा वाचकांचा ठाव घेतात. म्हणून आपणास त्यांच्या कथावाड.मयाकडे वळावे लागते.

यादवांच्या चरित्राचा, इतर वाड.मयाचा थोडक्यात आढावा पाहिल्यानंतर साहजिकच त्यांचे कथावाड.मय कोणते याचा थोडक्यात परिचय पाहू.

**1) "मातीखालची माती "**

"मातीखालची माती" हा यादवांचा पहिलाच कथासंग्रह आहे. हा कथासंग्रह त्यांनी 1965 साली लिहिला. त्यातील व्यक्तीचित्रांचे स्वरूप पाहता त्यांना व्यक्तीचित्रणात्मक कथा म्हणजेच अधिक योग्य ठरते. त्यांच्या कथेत व्यक्ती दारिद्रयाचे जीणे जगत, कष्ट करत जगताना दिसतात. त्यांच्यातील व्यक्ती या प्रामाणिक आहेत. दारिद्रयाच्या खाईत सापडल्या तरी कुठेही आपले दु:ख इतरांना सांगताना दिसत नाहीत.

"हाताबुडी आलेला शिवा" या कथेत लेखक आपल्या लहान भावाचे चित्रण करतो. तर 'चव्हाणाचा आबामा' हा तरूणपणात पैलवानकी केलेला पण उत्तर आयुष्यात मात्र त्याला कष्टाचे जीणे जगावे लागते. आणि कष्ट करत करत मातीची उब घेण्यासाठी निघून जातो. गोष्टी सांगणारा आबामा आपणास या कथेत दिसतो.

'आक्कुमावशी ' ही सरळमार्गी स्त्री आहे. तर 'बापू' हा बेरका आहे. आई बापाविना असणारा 'पोरका दिन्या' ढोर कष्ट उपसतो, तर प्रामाणिकपणे काम करणारा 'गोपा' पोटासाठी पोराचं मरणही सहजपणे सांगतो.

SHIVAJI UNIVERSITY KOLHAPUR

खादीपायी लाज सोडलेला 'घोंडबा' तर वेडाच्या लहरीत काहीतरी बडबडणारा व संशयाने पछाडलेला 'खुळा इठू' . प्राणीमात्रावर प्रेम करणारा 'बाबजी बल्लाळ' तर बैलांना काही नाही म्हणून चोरी करणारा त्याचबरोबर दुस-यांच्या शेतात रोजगार करून पोट भरणारा 'दत्तूमा'.

सतत लोखंडाचे तोंड असल्यासारखे बडबडत राहणारी तोंडगळ अशी 'फुलाआत्ती' तर फुकट काम करावे लागते म्हणून कामचुकारपणा करणारा 'गडी'.

बायकांसारखा वागणारा 'सखाराम' तर श्रध्दा आणि निष्ठा यांच्या जोरावर शंभोची सेवा करणारी 'तपस्वीनी' मधील नानी. या दोन व्यक्तीरेखा या वेगळया अशा आहेत.

अशा अनेक व्यक्तीरेखा वेगवेगळया प्रकारे जीवन जगताना दिसतात. चिखलातले जीणे जगणारी पण काही आनंदी असणा-या व्यक्तीही आपणास दिसतात. याचा विस्ताराने विचार आपण तिस-या प्रकरणात करणार आहोत.

2) "खळाळ"

'खळाळ' हा 1967 सालचा कथासंग्रह आहे. त्यामध्ये ग्रामीण माणूस आपली कथा स्वतःच सांगतो. यादवांच्या कथेतील व्यक्ती या दारिद्रयाने पिडलेल्या, दुःखी-कष्टी असल्या तरी आपले दुःख इतरांना न सांगता स्वतः सहन करत जीवन जगताना दिसतात.

"राजावाणी" या कथेतला 'मी' हा साधा शेतमजुर आहे. स्वतःच्या लग्नात दिडशे रूपयांचे कर्ज काढतो आणि ते दुस-यांच्यात काम करून फेडतो. बायकोही सारखी 'हे आणा ते आणा' म्हणत असते. आपली बायको बाहेरख्याली आहे आणि त्यातच ती त्याला सोडून जाते. असा हा कथेतला 'मी' राजावाणी जीवन जगत असताना दिसतो.

"वरातीचा शालू" मधील विधवा असणारी अंजना ही सतत कष्टच करत राहते. घरात भात करावयाचा म्हटला तरी तांदूळ नाही. कंट्रोलातून आणावा तर पैसे नाहीत, मुलांच्या अंगावर कपडे नाहीत. तिला पैसे उसने सुध्दा कोणी देत नाही. म्हणून आपला 'वरातीचा शालू'

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

मामलेदाराच्या बायकोकडे पन्नास रूपयांना देते. पण तिचं मन तिला सतत बेचैन करत असते आणि ती शालू परत घेऊन येते तो जपून ठेवते.

'गाळ' या कथेत गोंद्या हा विहिरीवरचे काम करत असतो. इतर कामापेक्षा हे काम बरे म्हणून तो तेथे कामाला जातो. त्याला ते पण काम जमत नाही. या विहिरीसाठी राबणा-या माणसांचे चित्रण या कथेतून अत्यंत प्रत्ययकारी केले आहे.

"ओझं" या कथेत पावसाळयाचे . वर्णन आहे. दत्तोबाचा बारका गाडा होता त्यावर नवराबायकोचं व मुलांचं पोट भरायचं आणि त्यांची रात्रीची भूक भागत होती. पण जास्त पाऊस असल्यामुळे कामंही मिळत नव्हती. हमालाच्या जीवनावर ही कथा प्रकाश टाकते.

'मोट' या कथेत बाबूला हि-या बैल सोलला गेलेला दिसतो आणि त्याबरोबर स्वप्नात आपणही सोललो जात आहोत असे दिसते.

"घुणं" या कथेतही तानीवर येशाचे प्रेम आहे पण येशाला आपली भावना तानीजवळ व्यक्त करता येत नाही. तानीही त्याच्या मनातला भाव ओळखू शकत नाही या कथेतील विविधांगी दु:खानुभव अतिशय प्रत्ययकारी वाटतात.

बदलत्या ग्रामीण जीवनाचे आणि यंत्रसंस्कृतीमुळे शेतीमध्ये झालेले बदल 'इंजेन' या कथेत आपणास दिसते.

कंगाल होऊन देवाच्या भजनी लागलेल्या वारक-याचे चित्रण 'वारकरी' या कथेत येते. तर 'बाळा पाडा ' या कथेतही बैलांचा सण बेंदराचे चित्रण येते.

'वखार' या कथेत सुब-या हा लाकडाची वखार चालवतो. त्याची लाकडं खपत नाहीत म्हणून तो लोकांच्या मरणाची वाट पहात बसतो. सुब-याचे भीषण वास्तव येथे चित्रित होते.

'सातवं' या कथेत गिरजाला दिवस गेलेले असतात. ती सातव्यांदा गरोदर असते. तरीही ती राबत असते. आणि काम करत असतानाच तिच्या पोटात कळा सुटतात मग ती घरी जाते.

'सून' या कथेत सून ही गरोदर राहते म्हणून ती आता पळून जाणार नाही अशी खात्री पटते.

स्त्री जीवनाची हालाखी 'सातवं' या कथेत वर्णित केले आहे तर ग्रामीण जीवनाचे व्यामिश्र रूप सुनेचे दाखविले आहे.

'मुंडरी' ही आपल्या अब्रूला जपणारी आहे. तर 'सासुरवाशीन' या कथेत एक सासुरवाशिन दुस-या सासुरवाशिणीची कथा सांगते.

'बायकू-पोरं' या कथेत बायकोच्या आणि आपल्या पोराच्या कामचुकारपणामुळे शेतमजूर असणा-या माणसाला एकटयाला राबावे लागते.

'मुद्या' ही कथा ग्रामजीवनातील दारिद्र्याचे भीषण वास्तव चित्रित करते.

'धुणं', 'सातवं' या कथा वगळता 'खळाळ'मधल्या सगळयाच कथा दारिद्रयाच्या सावटात हिंदकळताना दिसतात.

3) **'डवरणी'**

1982 मध्ये प्रसिध्द झालेला 'डवरणी' हा कथासंग्रह होय. स्वातंत्र्योत्तर काळातील बदललेल्या ग्रामीण जीवनाचे चित्रण डवरणी मध्ये येते.

"कोंडमारा" ही कथा गरिबीमुळे व्यथित झालेल्या दत्तूची कथा आहे. दत्तूचा दारिद्रयामुळे कोंडमारा झालेला आहे. संतुच्या शेतात कामाला आईने व बायकोने जाऊ नये असे वाटते. पण काम न मिळाल्याने मनाचा कोंडमारा करून चार दिवसांनी संतूकडे कामाला जावे लागते. मनाचा कोंडमारा असह्य झाल्याने तो बायकोलाच बदडून काढतो.

'खताची गाडी' ही धोंडबा सारख्या सामान्य असणा-या शेतक-याची कथा आहे. सधन शेतकरी सामान्य शेतक-याला जुमानत नाही. आणि त्यात ते भरडून निघतात . धोंडबा हा सामान्य शेतकरी परिस्थितीमुळे आपल्या मुलांना शिकवू शकत नाही. शिवाय धोंडबाही आपल्या मदतीला ही मुले येतील म्हणून मुलांना शिकवित नाही. अर्थातच मुलांचे जीवनही धोंडबासारखे असह्य होते.

"हलकं" ही कथा व्यसनाधिन बापूची आहे.

'शहाणा गाव' या कथेत खुळया शंकराच्या वेडेपणाचा गैरफायदा गावातील लोक कसे घेतात हे दाखविले आहे. ते त्याच्या वेडेपणाचा उपयोग आपल्या मनोरंजनासाठी सुध्दा करतात. या मनोरंजनापायीच गावकरी बिचा-या खुळया शंकरला पुरात उतरवण्यास भाग पाडतात.

"गिधाडं" या कथेत स्त्री जातीकडे हीनपण पहाणा-या समाजाचे वर्णन केले आहे. तर 'मल्लू रामोशी' ही गुन्हेगार समजल्या जाणा-या रामोशी जातीतील मल्लूची कहाणी आहे. परिस्थितीने मल्लू गुन्हेगार बनला आहे.

'ओढ' या कथेतील वनव्बा, तम्माला, नदीपासून रक्षण करू इच्छिते. परंतु दुर्दैवाने एके दिवशी जन्माला आलेल्या तम्माला नदीतल्याच सुसरी ओढून नेतात.

**4) उखडलेली झाडे**

' उखडलेली झाडे ' हा कथासंग्रह अलिकडील म्हणजेच 1986 चा आहे. इतर कथासंग्रहापेक्षा या कथासंग्रहात यादवांचे चिंतन अधिक प्रगल्भ होत गेले आहे. आपल्या कथासंग्रहाच्या मलपृष्ठावर यादवांनी म्हटले आहे -

> " ग्रामीण भागातील बदलत्या वर्तमान वास्तवाचे प्रखर भान व्यक्त करणारी ही कथा ग्रामविकास, सुधारणा, उद्योगीकरण यात अधःस्तरीय ग्रामीण समाज कसा भरडून निघत आहे, उखडला जात आहे हे दाखवून देते." 3

" गावचा मुख्यमंत्री ", " फळया आणि पारंब्या " या दोन कथा ग्रामीण राजकारणावर प्रकाश टाकणा-या आहेत. मुख्यमंत्री मध्ये अट्टल राजकारणी असणारा धोरणी बाळासाहेब तर ' फळया आणि पारंब्या ' मध्ये राजकारणामध्ये विष कालवणारा मुकुंदराव.

' कष्टाची लक्ष्मी ' मध्ये गंगारामची बायको आपली व्यथा सांगते. ' शेवटचं पायताण ' मध्ये तुकाम्मा हा आपले औद्योगिकरणामुळे चांभाराचे धंदे कसे बसले हे सांगतो म्हणूनच या दोन कथामध्ये यंत्रसंस्कृतीमुळे ग्रामीण जीवनावर कसा परिणाम होतो याचे चित्रण होते.

' भोवळ ' या कथेतील रावसाब शिकून सुध्दा बेकार आहे. ही कथा सुशिक्षित बेकाराच्या जीवनावर प्रकाश टाकते.

' फाटयाचं पाणी ' मध्ये लक्ष्मू हा स्वातंत्र्य सैनिक असतो. त्याला शेतामध्ये पाणी आणण्यासाठी हिंगेसाहेब पैसे मागतो. पण लक्ष्मूला हे मान्य नाही. भ्रष्टाचार व लाचलुचपतीवर ही कथा प्रकाश टाकते.

' सत्काराचा नारळ ' मध्ये अट्टल राजकारणी असणारा बाळासाहेब रेवण कुंभारसारख्या कारागिराची कुचेष्टा करतो आणि सत्कारात कुजका नारळ देतो.

' आंघोळीचा दिवस ' ही सधन शेतक-याचे चित्रण करणारी कथा आहे. आण्णांचे सुखवस्तू कुटुंब व दारिद्रयाच्या खाईत सापडून सुध्दा जगणारा शंकर या दोन कुटुंबातील संस्कृतीचे वर्णन या कथेत केले आहे.

' चावीचं पाणी ' मध्ये सुशिक्षित बेकार असणारा रावसाब चित्रीत होतो. त्याचबरोबर रावसाबासारखा असणारा सामान्य शेतकरी चित्रीत होतो.

' हिरवी संस्कृती ' मधील प्रा. भोईटे व ' पाषाणातील माणसं ' मधील जंगमसाहेब यांना ग्रामीण जीवनाबद्दल ओढ आहे. त्यांची मूळं घट्ट मातीत रोवून उभी आहेत.

' गीताबाई मरण पावली ' मधील पांढरपेशी असणारी माणसं आणि दुसरीकडे गीताबाईसारखी दारिद्रयाने पिडलेली माणसे यादव चित्रीत करतात.

' उद्योग वसाहत ' व ' भिंत ' या दोनही कथेत शहरातील औद्योगिकीकरणामुळे माणसामाणसातील अंतर वाढते आहे याचे चित्रण येते. ' भिंत ' मध्ये उच्चस्तर व निम्नस्तर हे दोन स्तर दिसून येतात. तर ' नवा हिशोब ' मध्ये दिनासारख्या गरिबाला डॉक्टर कोळसे कसे लुबाडतात हेच दिसते.

या सर्व कथांचा सविस्तर विचार तिस-या प्रकरणात येणार आहेच.

## संदर्भ सूची


1. आनंद यादव - झोंबी पृष्ठ क्र.116
2. आनंद यादव - मळयाची माती प्रसतावना पृष्ठ क्र.14
3. आनंद यादव - उखडलेली झाडे मलपृष्ठ